रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

## मराठी विभाग २०१८-१९

## रयत माऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील पुण्यतिथी कार्यक्रम

## अहवाल

**दि.०५ एप्रिल २०१९**

दि.०५ एप्रिल २०१९ रोजी महाविद्यालयामध्ये रयत माऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील (वाहिनी) यांच्या ८९ व्या पुण्यतिथीनिमित्त मा.प्राचार्य डॉ.टी.एस.पाटील (इतिहास अभ्यासक व संशोधक) यांचे "सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे जीवन व कार्य" याविषयावर व्याख्यांनाचे आयोजन करण्यात आले होते. रयत शिक्षण संस्थेच्या जडण-घडणीमध्ये रयत माउलींचा सिंहाचा वाटा आहे. असे मत त्यांनी व्यक्त करून त्यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेतला.

या व्याख्यानपर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे यांनी भूषविले. तर कार्यक्रमाचे प्रयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे यांनी आपल्या प्रास्ताविकपर मनोगतामध्ये कथन केले.

या दिनाचे औचित्यसाधून आणि रयत माउलींच्या आठवणीना उजागर करून महाविद्यालयामध्ये गेली २० वर्षे विचारेमळा झोपडपट्टीतील लोकांना 'खीर' वाटण्यात येते. या वर्षीही मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खिलारे तसेच महाविद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी 'खीर' करण्यासाठी येणारा खर्च स्वेच्छेने आणि सढळहाताने देऊन एक सामाजिक कार्य पार पाडले.

या कार्यक्रमासाठी कर्मवीर अण्णांचे कुटुंबीय, प्राचार्य माणिकराव पोवार, श्री.सतीश देसाई, श्री.वीरेन देसाई, श्रीमती. जयश्री देसाई, श्री.साळुंखे, तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.राजेंद्र देठे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

यासर्व उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.भाग्यश्री पुणतांबेकर यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.विनोद आखाडे यांनी केले.

प्रा.डॉ.एस.जे.आंवळे
सांस्कृतिक विभागप्रमुख

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

प्राचार्य